Poornam Eco Vision

# पूर्णमिदं

जानेवारी ते एप्रिल २०२२ | Vol 1 & 2





# संपादकीय

सर्वांना सस्नेह नमस्कार,काही महिन्यांच्या खंडानंतर, पुन्हा आपल्या भेटीला येत आहोत. मागील ६ महिन्यात बरेच कार्यक्रम, उपक्रम आपल्या सर्वांच्या सहभागामुळे यशस्वीरित्या पार पडले.

आपण पिंपरी चिंचवड येथे २६ जानेवारी रोजी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त झालेल्या 'e -yantran' या इ-कचरा जनजागृती आणि संकलन मोहिमेत सहभागी झालात, त्यामुळेच एकूण ८० ठिकाणी आपण संकलन करू शकलो. यादरम्यान संकलित झालेल्या इ-कचऱ्यातून आपण या भागातील ६ संस्थांना ८ संगणक दुरुस्त करून देऊ शकलो. या सर्व उपक्रमात ३ मुख्य आयोजक संस्था आणि १८ सहयोगी संस्था सहभागी झाल्या होत्या. दिनांक २७ फेब्रुवारी रोजी झालेल्या **'PEHEL - २०२२'** या पुणे शहरातल्याइ इ-कचरा आणि प्लास्टिक संकलन मोहिमेला सुद्धा आपण सर्व पर्यावरणप्रेमी नागरिकांनी आणि पुणे शहरातील स्वयंसेवकांनी भरभरून प्रतिसाद दिला आणि आपला सहभाग नोंदवला. यावेळी प्रथमच आपण शहरातील निरनिराळ्या सोसायट्यांना त्यांच्या उत्स्फूर्त सहभागासाठी आवाहन केले होते, त्याला प्रतिसाद देऊन सुमारे ३४७ ठिकाणी संकलन आयोजित केले.

यामध्ये सुमारे ३००० दात्यांनी इ -कचरा आणि प्लास्टिक कचरा देऊन यात सहभाग घेतला. कमिन्स इंडिया फाउंडेशन, आदर पूनावाला क्लीन सिटी आणि सुमारे १५ सामाजिक संस्था या उपक्रमात सहभागी झाल्या होत्या. यात १९ टन इ-कचरा आणि आठ टन प्लास्टिक कचरा जमा झाला. यातून तयार झालेले सुमारे पंचवीस संगणक आणि दहा लॅपटॉप पुढील कालावधीत गरजू संस्थांपर्यंत पोचविण्यात येतील. त्याच बरोबर यावर्षी पर्सिस्टंट कंपनीबरोबर सी.एस.आर. अंतर्गत कंपनीतील संगणक आणि लॅपटॉप दुरुस्त करून गरजू संस्थांना देण्यासंदर्भात योजना पुढील कालावधीत करण्यात येत आहे. या सर्व प्रकल्पामध्येआपण सहभागी व्हावे ही विनंती.

यावर्षी उन्हाळ्याच्या कालावधीत पर्जन्य जल व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत विविध गावांमध्ये महाराष्ट्रातील छतावरील पाण्याचे नजीकच्या पाणीसाठ्यात संवर्धन करावे, यासाठी निरनिराळे प्रकल्प हाती घेत आहोत पुणे शहरामध्ये अशा प्रकारचे प्रकल्प वेगवेगळ्या सोसायटीत करत आहोत, त्याच बरोबर विविध गावांमध्ये असे प्रकल्प राबवले जात आहेत. सेवावर्धिनी सोबत जलदूत प्रकल्पांतर्गत तीन गावांमध्ये हा प्रकल्प कार्यान्वित केला गेला. पर्जन्य फाउंडेशन व मॅप्स इंडस्ट्रीज यांच्या साह्याने आणि आयसीआयसीआय फाउंडेशन मार्फत बीड जिल्ह्यातील १०० गावी हा प्रकल्प पुढील सहा महिन्यात राबवला जाणार आहे अशा प्रकारचे प्रकल्प राबवण्यात आपण यथाशक्ती सहभागी व्हावे अशी विनंती.पुढील कालावधीत याच प्रकल्पांमध्ये विविध उपक्रम आपल्या सोबत करण्याची इच्छा आहे या सर्व प्रकल्पांना आपली साथ मिळेलच जेणेकरून पर्यावरण संवर्धन आला हातभार लागेल.

**आगामी पर्यावरण दिनाच्या तयारीसाठी सर्वांना शुभेच्छा.... !!!!**





**राजेश मणेरीकर**


We are located at :)

'Ratnaprabha Bungalow', Near Maha E-Seva Kendra, Panchali Sweet Lane, Sinhagad Road, Vadgaon BK, Pune-411041

Website: www.poornamecovision.org,

E-mail: contact@poornamecovision.org,

Contact No.: 020-29521862

# Trimonthly Report

January-February- March 2022

## E-waste and Plastic Waste Management

Total Society Drives: 10

Community Drives: 3

Pocket Drives across Pune City: 4

Number of Donors: 3250 +

Ongoing weekly E-waste Collection Centers: 12

E-waste Collection: 20.7 tons

Plastic Waste Collection: 9.2 tons

Donated Devices: 10

Donated to: Schools suggested by Cummins India Foundation

## Volunteering Engagement

Number of activities conducted: 2
Activities:
1. eYantran Drive: E-waste collection drive

2. PEHEL 2022 Megadrive

Participated Volunteers: 1100+

Total No of Eco-friends: 350+

## Fabric Up-cycling

Number of promotional stalls: 19

Women Employed: 6

Number of training: 3 sessions

Jeans: 175 nos.

New product samples: 7

## Green Consultancy

Number of Running Composting Units:
Laxmi Park Society *(Navi Peth)*, Balaji Temple, Krishnakamal Society *(Pashan)*, Café Climate *(Hinjewadi-Kasarsai Road)*

Garden Waste Composting Units:
Viloo's Farm House *(Theur)* and Pune Cantonment Board

Number of Running Rain Water Harvesting Units:
At Laxmi Park Society *(Navi Peth)* &
Bhushan Apartment *(Karvenagar)*
Yajurved Society *(Karvenagar)*,
Cindrella Society *(Pashan)*,
Private Bungalow *(Pashan)*

Number of Running Biogas Units:
Balaji Temple *(Pashan)*



# Events

## eYantran

E-yantran was an **E-waste collection megadrive held on 26 January 2022.** The name 'eYantran' is derived from eWaste ka Niyantran (control). The logo is symbolic of the lifecycle of the eWaste to its transformation into an eco-friendly end product or state. Objective of this drive was to reduce electronic trash generated in urban India, through its scientific handling and disposal. Usually there is a great response for e-waste drives. E-yantran was no exception to that. About 3.5 ton E-waste was collected. More than 200 volunteers participated in the event.

The event was a huge success. In order to make it successful many organisations collaborated; Namely Paryavaran Sarakshan Gatividhi, Swatantraveer Savarkar Mandal (Nigadi), Sevavardhini, Rotary club of Pimpri, Rotary International, Swargiya Dattopanta Maskar Sarvajanik Vishwastha Sanstha, Matrumandir Vishwasta Sanstha, Dr. DY Patil College of Pharmacy-NSS, Swargiya Tatya Bapat Smriti Samiti, Indra Raghunath Foundation, Snehachhaya Samajik Prakalpa, Green Army, Sevasaraathi, Surya Foundation, Lions International Club, Sahayog Foundation.
















# PEHEL 2022 Drive

Pune Municipal Corporation (PMC) and various social enterprises cordially organized "PEHEL-2022" where E-waste and plastic collection is collected across Pune city on the occasion of Saint Gadge Maharaj Jayanti & National Science Day. **"PEHEL" stands for Plastic & E-waste Handling for Eco-friendly Lifestyle.** During 20th to 26th February awareness activities were conducted and actual collection was done on 27th February.



On the day of collection total **19 tons of E-waste and 8 tons of plastic waste was collected on 346 centers** across city. About 900+ volunteers were engaged in this megadrive. **Around 3000+ donors** donated E-waste & Plastic waste. Awareness was spread through distribution of pamphlets, display of banners and posters at center locations as well as residential complexes around centers, publishing appeal videos and posters on social media and appeal on Private Radio channel RED FM (95.0 Kilohertz). In addition publicity of the event was carried out through cycle branding.



Renowned faces of Pune namely Mayor Mr. Muralidhar Mohol, Additional Municipal Commissioner Dr. Kunal Khemnar & Vice Chancellor of SPPU Dr. Nitin Karmalkar appealed through video published on media for participation of citizens of Pune City. Some known faces from Marathi television, Marathi film industry & Marathi Music Industry namely milind Shinde, Rupal Nand, Shrikant Yadav, Mangesh Borgaokar, Sayali Panase & Pramod Ranade appealed citizens for participation through video bite on social media platforms.



Purpose behind this mega-drive is to aware more people and to establish proper formal system of E-waste & plastic management. In future, we aim to establish one permanent weekly collection center per 10,000 population must be established across city.





# धागा धागा अखंड विणुया...
# पर्यावरण संरक्षणाचा वसा घेऊया...

सध्या देशभरात Make in India ही संकल्पना भारत सरकार तर्फे समर्थपणे राबविली जात आहे. या संकल्पनेमध्ये भारतातच भारतीयांद्वारे भारतीयांसाठी वस्तू निर्मिती आणि स्वयंरोजगार ही उद्दिष्ट्ये प्रामुख्याने डोळ्यासमोर ठेवून विविध योजना राबविल्या जाताना दिसत आहेत. २०१२ साली काहीशी हीच उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून 'पूर्णम' इकोव्हीजन फाउंडेशनची मुहूर्तमेढ रोवली गेली. आपण ज्या वस्तू वापरतो त्यातून कळत नकळत टाकाऊ पदार्थ किंवा कचरा तयार होत असतो. या कचऱ्यातून आपल्या दैनंदिन जीवनात कालबाह्य झालेल्या इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रिक वस्तू, वापरून झालेले कपडे आणि प्लास्टिकच्या वस्तू यांचा पुनर्वापर किंवा कालबाह्य ठरलेल्या वस्तूंचा कल्पकतेने वापर 'पूर्णम' कडून केला जातो. त्याचबरोबर ओल्या कचऱ्याचे कंपोस्ट करून सेंद्रिय खत तयार करणे, बायोगॅस तयार करणे असे विविध उपक्रम 'पूर्णम' तर्फे राबविले जातात.

यासाठी 'शाश्वत विकास', **'3R संकल्पना म्हणजे Reduce, Re-use, Recycle'** , 'टाकाऊतून टिकाऊ', 'प्रदूषण मुक्त भारत' ही उद्दिष्ट्ये लक्षात ठेवून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून पूर्णमने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. या उपक्रमांमधून गेली सुमारे दहा वर्षे पर्यावरण रक्षण आणि संवर्धन यात पूर्णमने आपला ठसा उमटवला आहे. त्यात प्रामुख्याने इ-कचरा आणि प्लास्टिक कचरा संकलन व व्यवस्थापन, रेन वॉटर हार्वेस्टिंग, ओल्या कचऱ्या पासून खत निर्मिती आणि जुन्या कपड्यांचे संकलन व त्यापासून नवीन वस्तू बनवणे अशा अत्यंत अभिनव आणि प्रभावी संकल्पना 'पूर्णम'तर्फे राबविल्या जातात.

यात जुन्या कपड्यांच्या संकलनामध्ये विशेषतः जीन्स च्या जुन्या कपड्यांपासून नवीन विविध आकर्षक कापडी वस्तूंची निर्मिती तसेच स्वयंरोजगार ही संकल्पना अत्यंत प्रभावशालीपणे पूर्णमद्वारे मूर्त स्वरूपात आणण्यात आली आहे. **जुन्या कपड्यातून नवीन वस्तू निर्माण करणे या संकल्पनेला 'Fabric Upcycling' असे म्हणतात.** या प्रकल्पामध्ये महिलांचा सहभाग हा अत्यंत मोलाचा ठरतो. विशेषतः विविध प्रकारच्या पिशव्या, पर्स ,शालेय तसेच नीत्योपयोगी अशा आकर्षक वस्तू बनवण्यात महिलांचा कल्पक दृष्टिकोन हा नेहमीच उपयोगी ठरतो. यात महिलांचे सबलीकरण हा महत्त्वाचा मुद्दा पूर्णमने विचारात घेऊन जास्तीत जास्त महिलांना जुन्या कपड्यातून नवीन वस्तू तयार करणे, यातून स्वयंरोजगार साधणे हे उद्दिष्ट सफल केल्याचे इथे विशेष नमूद करावेसे वाटते, कारण यासाठी कुठल्याही उच्च शिक्षणाची गरज नसून गरीब व गरजू महिला यातून स्वतःचा विकास साधू शकतात हे पूर्णमने समाजापुढे सिद्ध केले आहे.

'पूर्णम' संस्थेद्वारे जुन्या कपड्यातून पुनर्निर्मितीच्या अनेक उपसंकल्पनाही कार्यरत आहेत. **'Your Fabric Our Skills'** यामध्ये आपल्या वापरलेल्या जीन्स पॅन्ट पासून अत्यंत अल्प दरात नवीन वस्तू तयार करून दिल्या जातात तसेच जुन्या कपड्यातून विविध खेळणी, गोधडी, दागिने या व यासारख्या इतर वस्तूंच्या निर्मितीचे प्रशिक्षण महिला बचत गट व अन्य गरजू महिलांना मोफत कार्यशाळेचे आयोजन करून वेळोवेळी मार्गदर्शन दिले जाते.

'पूर्णम'द्वारे जुने कपडे संकलन करून त्यातून उत्तम स्थितीतील कपडे हे गरजू संस्था, आदिवासी वस्ती अशा ठिकाणी दान केले जातात. त्याचबरोबर 'पूर्णम' इकोव्हीजन ही संस्था परिस्थितीनुरूप आपले कार्यक्रम राबवत असते. अचानक उद्भवणाऱ्या आपत्तीचे काळात 'पूर्णम' संस्थेकडे संकलित केलेल्या कपड्यांमध्ये उत्तम स्थितीतील कपडे हे मदत म्हणून गरजूंना वाटप केले जातात. पूरपरिस्थिती व नैसर्गिक आपत्तीचे वेळी अशा प्रकारची मदत गरजूंना खूप उपयोगी ठरत असते. तसेच यात विशेष नमूद करावेसे वाटते की २०२० सालामध्ये उद्भवलेल्या Covid-19 सारख्या प्रचंड मोठ्या महामारीच्या वेळी अनेक लोकांना आपले व्यवसाय गमवावे लागले होते व व्यवसायाचे नवे पर्याय शोधत असताना 'पूर्णम' संस्थेने नवीन दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवून त्यावेळच्या परिस्थितीला अनुरूप 'मास्कची निर्मिती' ही संकल्पना घेऊन मोठ्या प्रमाणावर महिलांना स्वतःचे घरी स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून दिली. यात मुख्यत्वे महिला बचत गटाच्या प्रतिनिधींची मदत घेऊन त्यांना मास्क निर्मितीचे योग्य ते प्रशिक्षण देऊन, घरोघरी मास्क निर्मिती करणाऱ्या महिलांनाही सुयोग्य मार्गदर्शन करून सुमारे दीड लाख मास्कची निर्मिती करून सदरचे मास्क 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर वेगवेगळ्या संस्थांमध्ये वितरित करण्यात आले. ही सामाजिक बांधिलकी 'पूर्णम'ने अत्यंत समर्थपणे सांभाळून महामारीच्या संकटाच्या काळात रोजगार तसेच मास्कद्वारे संरक्षण हे सर्वसामान्यांना उपलब्ध करून दिले.

याबद्दल सर्व स्तरातून पूर्णमला आजही शाबासकी दिली जाते. शासकीय यंत्रणा, सामाजिक संस्था, सर्वसामान्य जनता यांच्याकडून पूर्णमचे होत असलेले कौतुक हे 'पूर्णम' साठी तन-मन-धनाने स्वत:ला 'पूर्णम'च्या झोकून दिलेल्या स्वयंसेवकांचे यश आहे व असे प्रभावी निष्ठावंत व सातत्याने सहकार्य करणारे स्वयंसेवक 'पूर्णम' कडे आहेत याचा पूर्णमला सार्थ अभिमान वाटतो. सर्व स्वयंसेवकांना धन्यवाद देत असतानाच 'पूर्णम' संस्थेची अशीच घोडदौड पुढे चालू राहण्यासाठी समाजाच्या सर्व स्तरातील बांधवांकडून व हक्काच्या स्वयंसेवकांकडून अशाच सहकार्याची अपेक्षा 'पूर्णम' व्यक्त करत आहे.

"**एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ**" हे ब्रीदवाक्य डोळ्यापुढे ठेवून 'पूर्णम' इकोव्हीजन संस्था आपल्या स्वयंसेवकांसह व आपल्या सर्वांच्या सहकार्याने पुढील मार्गक्रमण यशस्वीपणे करेल ही मी ग्वाही देत आहे.



**मन:श्री बापट**

## Volunteer Feedback

I am glad that I am one of the members of Poornam family. I believe that a motivated volunteer force can make a tremendous difference which can create big impact on community.

I started contacting my friends, my workmates through calls, messages and social media and started giving information about Poornam and its valued work for environment and society. Very few people actually take actions in this direction.
Poornam gave me the chance to meet this 'very few' people.

Along with this, I learned new skills;To speak with people, to express my thoughts in simple way, to connect with new people and getting new experiences.

Today, I can say that I am inspired to work in this path and reach Poornam's work to many many more people.

Thank you Poornam for giving me this opportunity.

- Prarthana (Volunteer)



# Photo Gallery





glimpses from E-Yantran

PEHEL 2022
Plastic and E - waste Handling for Ecofriendly Lifestyle





glimpses from PEHEL megadrive





Rain Water Harvesting Units at Alsunde

E-waste and plastic waste collection drive arranged by Mercedes Benz India






















# OUR PRODUCTS